# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०८/०६/२०२४ (शनिवार) दुपार**

---

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक
## पोलीस स्टेशन भिवापूर ची कार्यवाही

दिनांक ०७/०६/२०२४ रोजी पोलीस स्टेशन भिवापूर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे भिवापूर हद्दीतील समर्थ पेट्रोलपंप जवळ भिवापूर येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची टिप्पर व्दारे चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून समर्थ पेट्रोलपंप जवळ भिवापूर येथे भिवापूर पोलिस स्टाफ यांनी नाकाबंदी करून १) १० चक्का टिप्पर क्र. एम एच ४० बी एफ ४८२४ चा चालक आरोपी नामे — लोकेश दयाराम नवघरे, वय ३० वर्ष रा. कावरापेठ उमरेड २) १० चक्का टिप्पर क्र. एम एच ४० बी एल ३४०० चा चालक आरोपी नामे— रोहीत ज्ञानेश्वर बोबाटे वय २२ वर्ष, रा. टेकाडी त. पवनी जि. भंडारा यांनी आपापल्या वाहनात प्रत्येकी ०६ ब्रास रेती हे टिप्पर व्दारे अवैधरीत्या रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने त्यांच्या ताब्यातून १) १० चक्का टिप्पर क्र. एम एच ४० बी एफ ४८२४ किमती १५,००,०००/—रू. मध्ये ०६ ब्रास रेती किंमती ३०,०००/—रू. २) १० चक्का टिप्पर क्र. एम एच ४० बी एल ३४०० मध्ये ०६ ब्रास रेती किंमती ३०,०००/—रू. असे दोन्ही वाहनामधील एकुण १२ ब्रास रेती किंमती ६०,०००/—रू. असा एकुण वाहनासह ३०६००००/— रूपयाचा मुद्देमाल आरोपींच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी पो.स्टे. भिवापूर येथे आरोपीतांविरूद्ध कलम ३७९, १०९, ३४ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. भिवापूर येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे भिवापूर येथील ठाणेदार सपोनि जयप्रकाश निर्मल, पोउपनि संदीप सडमेक, पोहवा राकेश त्रिपाठी, पोशि प्रितम खोपे पोशि निकेश आरीकर पोना मुकेश जयस्वाल यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर